**एस.सी. सी. ११८६/२०१४**
**सरकार वि. उत्तम राठोड +४**
**साक्षीदार क्र. ०६, नि. क्र.७२**

साक्षीदाराचे नाव- संगिता गणपतराव सावळे
वय. ४८ वर्ष, उपजिवीका.- शिक्षण विस्तार अधिकारी
सध्या नेमणुक जिल्हा परिषद औरंगाबाद.

**<u>पुढील सरतपास शपथेवर सरकारी पक्षातर्फे श्री.पी. आर. कुर्लेकर यांच्या मार्फत ०४.३० मिनीटांपासुन सुरु.</u>**

**१.** मी कन्नड येथे शिक्षण विस्तार अधिकारी म्हणुन सन २००७-२०१५ पर्यत कार्यरत होते. माझ्याकडे सन २०१२ ते सन २०१४ च्या दरम्यान प्रभारी गट शिक्षण अधिकारी या पदाचा कार्यभार होता. सदरची घटना दिनांक २१.०२.२०१४ ची आहे. त्यादिवशी मी पंचायत समिती कन्नड येथे माझ्या कार्यालयात होते. तेव्हा मला तहसिलदार यांचा फोन आला व त्यांनी मला कळविले की तेलवाडी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे कॉपीचे प्रकरण घडलेले आहे. तसेच माझे सहकारी परिरक्षक (कस्टोडीयन) कल्पना पदकोंडे (साक्षीदार क्र. ५ ) यांचा फोन आला होता व त्यांनी सुध्दा कळविले होते की, कॉपी प्रकरण घडले आहे व तेथे जाणे आहे.

**२.** मी व कल्पना पदकोंडे आम्ही दोघेही सुमारे १.३० ते ०१.४५ च्या सुमारास तेलवाडी येथील शाळे जवळ पोहचलो. तेथे पोलिस होते. त्यांनी आम्हाला घरात नेले. तेथे त्यांनी आम्हाला इंग्रजी विषयाचा काही प्रश्नपत्रीका दाखविल्या. मला प्रश्नपत्रीका दाखविल्यास त्या मी ओळखु शकते. आता मला आर्टिकल A,B,C,D वरील प्रश्नपत्रीका छायांकित प्रती दाखविण्यात आल्या. ते तेच आहेत. या प्रश्नपत्रीकांवर अनुक्रमांक १ वर आमची सही आहे.

**३.** पोलिसांनी आम्हाला आर्टिकल A,B,C,D छायांकित प्रश्नपत्रीका मुळ प्रश्नपत्रीकेसाबत तुलना करुन अभिप्राय देण्यास सांगीतले. तेव्हा परिक्षा संपली नव्हती. परिक्षा संपल्यावर आमच्यापैकी कोणीतरी विद्यार्थांकडुन मुळ प्रश्नपत्रीका घेउन आले मी व कल्पना आम्ही दोघींनी मिळुन छायांकित प्रश्नपत्रीका व मुळ प्रश्नपत्रीका तुलना केल्या व त्यामधुन असा निष्कर्ष काढला की त्या बरोबर होत्या. मला मुळ प्रश्नपत्रीका दाखविल्यास मी ओळखु शकते.

आता मला आर्टिकल E, F, G  वरील प्रश्नपत्रीका छायांकित प्रती दाखविण्यात आल्या. ते तेच आहेत.

**४.** त्या इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रीका होत्या. त्यानंतर पोलिसांनी खात्री करुन घेतली व पंचनामा केला. आता मला निशाणी ७१ वरील पंचनामा दाखविण्यात आला तो तोच असुन अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**<u>सरतपासात पुर्ण</u>**

**<u>उलटतपास आरोपीचे विधीज्ञ श्री. पी.एफ. पाटणी यांच्याद्वारे सुरु</u>**

**५.** मी पदनामाप्रमाणे कल्पना  (साक्षीदार क्र. ५) यांच्यापेक्षा वरिष्ठ आहे. परिक्षा संदर्भात बोर्ड येथे परिरक्षक यांच्याकडे सुचना पाठवितात. परिक्षा प्रक्रियेशी माझा काही संबंध येत नाही.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, ०१.३० ते ०१.४५ च्या आधी काय झाले हे आम्हाला माहीत नाही.  पंचनामा किती वाजता केला हे मला सांगता येणार नाही. जो काही पंचनामा झाला तो ०१.३० च्या नंतरच करण्यात आला होता किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

**प्रश्न.** मुळ प्रश्नपत्रीका या बोर्डाच्याच मुळ प्रश्नपत्रीका आहे याची खात्री केली का?

**उत्तर.** नाही, परिक्षा देउन बाहेर पडलेल्या विद्यार्थांकडुन मुळ प्रश्नपत्रीका आम्ही मुळ कर्मचा-याकडुन मागीतली होती.

**७.** पेपरची वेळ ११ ते २ अशी होती. मुळ प्रश्नपत्रीका केंद्राच्या आवारातुन घेण्यात आले होते किंवा कोठुन ते मी स्वतःप्रश्नपत्रीका न घेतल्यामुळे सांगता येणार नाही. मला सांगता येणार नाही की, प्रश्नपत्रीका विद्यार्थांच्या घरी जाउन आणण्यात आले होते किंवा कसे.

**प्रश्न.** पोलिसांच्या जबाबामध्ये ' प्रश्न पत्रीका विद्यार्थांच्या घरी जाउन आणले आहे' असे लिहीले असेल तर ते चुकीचे आहे ?

**उत्तर.** मला सांगता येणार नाही.

८. आता मला पोलिसांनी घेतलेला माझा जबाब दाखविण्यात आले. आता मला ... . '*कै. वसंतराव नाईक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तेलवाडी जे सदर बील्डींगच्या आजुबाजुला राहणारे १२ वीच्या वर्गातील परिक्षार्थी यांचे कडुन इंग्रजी विषयाची प्रश्नपत्रीका घेउन...* ' वाचुन दाखविण्यात आली. साक्षीदार सांगते की यामध्ये घरुन आणले असा उल्लेख नाही.

९. आम्ही प्रश्नपत्रीकेचे चार संचांची तुलना केली होती. आता मला ज्या काही मुळ प्रश्नपत्रीका दाखविल्या त्या चार संचामध्ये आहे. आता मला आर्टिकल E,F,G वरील मुळ प्रश्नपत्रीका दाखविण्यात आली. त्यामध्ये तीनच प्रश्नपत्रीकेचे संच आहे. साक्षीदार स्वतः सांगते की, आम्ही त्यावेळेस चार मुळ प्रश्नपत्रीकेचे संच असल्याचे आठवते.

**प्रश्न.** अभिलेखावरुन चौथा संच कोणता होता, कशाचा होता त्याची तुलना कशाबरोबर केली हे तुम्ही सांगु शकत नाही?

**उत्तर.** अभिलेखावर नाही. त्यावेळेस आम्ही पाहीले होते.

१०. गट शिक्षण अधिकारी असताना मला त्यावेळेस परिवेक्षक किंवा परिक्षा केंद्र प्रमुख यांचे परिक्षेदरम्यान गैरप्रकाराबाबत तक्रार आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, परिवेक्षक किंवा परिक्षा केंद्र प्रमुख गट शिक्षण अधिकारी म्हणुन माझ्या अधिपत्याखाली येतात. साक्षीदार स्वतःहुन सांगते की बोर्डाच्या अधिपत्याखाली येतात.

११. हे म्हणणे खरे आहे की, मी तेलवाडी येथील वसंतराव नाईक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे परिक्षा केंद्रावर त्या दिवशी गेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, जे काही साहित्य होते ते परिक्षा केंद्राच्या बाहेर होते परिक्षा केंद्रामध्ये नव्हते.

**प्रश्न.** त्यादिवशी माझ्याकडे गट शिक्षण अधिकारी म्हणुन कार्यभार होता त्या सदंर्भात पोलिसांना तुम्ही कागदपत्रे दिले काय ?

**उत्तर.** पोलिसांनी माझ्याकडे मागणी केली नाही त्यामुळे मी दिले नाही.

१२. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्यावेळी तिथे पोहचलो होतो त्यावेळी पोलिस तेथे आले होत व त्यांच्याकडे झेरॉक्स होत्या. हे मी सांगु शकत नाही की, झेरॉक्स प्रतीशी

आरोपींचा काहीही संबंध नाही. झेरॉक्स कोठुन आल्या काय आल्या याबाबत देखील मला काहीही माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी आम्हाला दोन प्रश्नपत्रीकांचे संच (चार प्रश्नपत्रीका) दिला व तुलना करायला सांगीतले व अभिप्राय घेतला त्या व्यतीरिक्त मला काही माहीती नाही.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, आम्ही जो काही अभिप्राय दिला तो आम्ही लिखीत कोणालाही दिलेला नाही. त्याबाबत मी तोंडी आमच्या वरिष्ठांना सांगीतले होते. लेखी परिरक्षक यांनी दिले होते. मी लेखी पाठविले नव्हते. कल्पना (साक्षीदार क्र. ५ ) माझ्यासोबत होत्या व त्यांनी लेखी काय कळविले हे मला माहीत नाही.

**१४.** हे म्हणणे खरे नाही की, मी सांगीतलेली घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तेथे झेरॉक्स वैगरे काहीही मिळालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांच्या सांगण्यावरुन मी जबाब दिला व आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या काही सहया केल्या त्या पोलिस ठाण्यातच केल्या. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यावर सहया मी पोलिस ठाण्यात केल्या.

**उलटतपास ०५.२० मिनीटांनी संपला आहे.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2024.09.03 10:43:09 +0530

**ठिकाण : कन्नड**
**दिनांक : ३०/०८/२०२४**

**(काटकर विजया एन.एस.)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.३) कन्नड.**